कला अकादमी गोवा



# बाल- युवा कीर्तन स्पर्धा

## नियमावली

# कला अकादमी गोवा

## बाल- युवा कीर्तन स्पर्धा

गोमंतकीय कीर्तन परंपरा वृध्दिंगत व्हावी व नव्या पिढीतील उदयोन्मुख बाल-युवा कीर्तनकारांना सादरीकरणासाठी मुक्त व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्‌देशाने कला अकादमी गोवा बाल-युवा कीर्तन स्पर्धेचे आयोजन करीत आहे.

या स्पर्धेचे सर्वसाधारण नियम व अटी पुढीलप्रमाणे आहे :-

१.बाल-युवा कीर्तन स्पर्धा कला अकादमीतर्फे राज्यस्तरावर घेण्यात येईल.

२.या स्पर्धेत केवळ गोमंतकीय मुला-मुलींना भाग घेता येईल.

३.विहित नमुन्याच्या प्रवेशिकेतील सर्व तपशील स्पर्धकाने पूर्णरित्या भरणे आवश्यक असेल. उशिरा आलेल्या व अपूर्ण प्रवेशिका ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

४.सदर स्पर्धा बाल व युवा अशा दोन वयोगटामध्ये घेण्यात येणार असून ७ ते १४ (बाल कीर्तनकार) असा एक गट व १५ ते २१ (युवा कीर्तनकार) अशी दुस-या गटासाठी वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. कला अकादमीकडे ज्या महिन्यात स्पर्धेसाठी प्रवेशिका मागविल्या जातील त्या महिन्यापासून ही वयोमर्यादा लागू होईल.

५.बाल व युवा स्पर्धकांसाठी कीर्तनाची विभागणी करण्यात आली असून बालांना पुर्वरंग तर युवा कलाकारांना आख्यान सादर करावे लागेल. पुर्वरंग व आख्यानासाठी खाली दिलेल्या आपल्या पसंतीच्या कोणत्याही एका विषयाची निवड करुन स्पर्धे दिवशी कीर्तन सादर करणे बंधनकारक आहे.

| बाल कलाकार (पुर्वरंग) | युवा कलाकार (आख्यान) |
|---|---|
| १. भक्ती | १. संत चरित्र |
| २. नाम महात्म्य | २. पैराणिक |
| ३. स्त्संग | ३. सामाजिक |

✻वरील विषय सोडून किर्तन सादरीकरण करु नये. तसे झाल्यास सदर स्पर्धकाला स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल.

६.कीर्तन सादरीकरणासाठी प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त २० मिनिटे देण्यात येतील. वेळेचे बंधन न पाळणारा स्पर्धक स्पर्धेतून आपोआप बाद ठरविला जाईल.

७.स्पर्धेत भाग घेण्यासाठी कला अकादमीच्या विहित नमुन्यातील प्रवेशिकाच ग्राह्य धरल्या जातील.सदर प्रवेशिका सोबत जोडण्यात आली आहे. स्पर्धकांनी प्रवेशिकेत दिलेल्या गटासमोर आपल्या वयाप्रमाणे (✓) खुण करवी.

८.कीर्तन सादरीकरणासाठी संवादिनी व तबला साथसंगत कला अकादमीतर्फे पुरविण्यात येईल. **तसेच स्पर्धकांना वेगळे संगीत साथीदार घेता येणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावीं**

९.स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकाला प्रवासखर्च व पूर्वतयारीसाठी रू.५००/-देण्यात येतील.

१०सदर स्पर्धेसाठी बाल व युवा अशा दोन्ही गटात स्वतंत्रपणे पारितोषिके देण्यात येतील, त्याची विभागणी खालीलप्रमाणे :-

| | बाल कलाकार | युवा कलाकार |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | - रु. ५०००/- | - रु. ७०००/- |
| व्दितीय पारितोषिक | - रु. ३०००/- | - रु. ५०००/- |
| तृतीय पारितोषिक | - रु. २०००/- | - रु. ३०००/- |

रु.१०००/-ची प्रत्येकी तीन उत्तेजनार्थ छारितोषिके देण्यात येतील. (बाल कलाकार)

रु.२०००/-ची प्रत्येकी तीन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येतील. (युवा कलाकार)

११.वरील सर्व पारितोषिके घ्यावी किंवा नाही याचाही निर्णय परीक्षक मंडळावर राहील. स्पर्धेत कोणतेही पारितोषिक विभागून दिले जाणार नाही.

१२.स्पर्धकांनी आपले नाव बँक खात्यानुसार संबंधित तक्त्यांत/प्रवेशअर्जात इंग्रजीत नमूद करणे आवश्यक आहे. विजेत्यांचे धनादेश त्यानुसारच काढण्यात येतील. त्यामुळे प्रत्येक स्पर्धकाने संबंधित नावे देताना योग्य ती काळजी घ्यावी. धनादेश बदलून देण्यासंबंधात कोणतीही विनंती कला अकादमी मान्य करणार नाही तसेच धनादेश वैध मुदतीत न वटविल्यास नव्याने धनादेश देण्याची जबाबदारी कला अकादमीवर राहणार नाही.

१३.स्पर्धकाच्या सादरीकरणाचे मूल्यमापन कला अकादमीने नेमलेल्या स्वतंत्र परीक्षक मंडळाकडून केले जाईल व यासंबंधीचा परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल. त्यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारार्थ घेतली जाणार नाही तसेच निकालासंदर्भात कोणताही तक्रारवजा पत्रव्यवहार करणा-या अथवा निकालावर सार्वजनिक माध्यमांतून टीका अथवा आलोचना करणा-या स्पर्धकाला पुढील दोन वर्षे स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

१४.स्पर्धेचे परीक्षण करताना वक्तृत्व , ताल-स्वर, गायन , अभिनय, कीर्तनाच्या विषयाची निवड, विषयाचा अभ्यास, आशयपूर्णता व श्रोत्यांवरील प्रभाव इ. घटकांचा प्रामुख्याने विचार केला जोईल.

१५.स्पर्धकाचे वय किंवा इतर संदर्भात कोणताही तक्रार/आक्षेप असल्यास तशी तक्रार लेखीस्वरुपात स्पर्धेतील शेवटचे सादरीकरण संपण्यापूर्वी अकादमीच्या प्रतिनीधीकडे देणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या तक्रारीचा कोणताही विचार केला जाणार नाही. अशा तक्रारी/आक्षेप केवळ सदर दिवशी स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकानांच घेता येईल.

१६.कोणत्याही स्पर्धक कलाकाराच्या वय व इतर संदर्भात कांही आक्षेप आल्यास/उद्भवल्यास सदर स्पर्धकाला सक्षम प्राधिकरणाने दिलेला जन्म दाखला, अधिकृत ओळखपत्र अथवा तत्सम/समकक्ष दस्तावेजाची प्रत निकाला अगोदर अकादमीच्या प्रतिनिधीच्या मागणीनुसार सादर करणे बंधनकारक आहे.

१७. अकादमीकडे प्रवेशिका आल्यानंतर स्पर्धेचे ठिकाण व वेळ जाहीर करण्यात येईल. त्यानुसार स्पर्धेच्या दिवशी सादरीकरणाचा अनुक्रम सर्व स्पर्धकांच्या उपस्थितीत चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल. त्यासाठी सर्वांनी निर्धारित केलेल्या ठिकाणी स्पर्धा सुरु होण्याअगोदर किमान अर्धा तास उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

१८.स्पर्धेची कार्यवाही चालू असताना स्पर्धकांनी कोणत्याही स्वरुपाचा हेतु पुरस्सरपणे अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्याचे अकादमीच्या निदर्शनास आल्यास संबंधित स्पर्धक कलाकाराला सदर स्पर्धेतून तसेच अकादमीच्या इतर स्पर्धा व महोत्सवातून भाग घेण्यास पुढील तीन वर्षाकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

१९.कोणत्याही स्पर्धकाला कला अकादमीच्या पूर्व समंतीविना ऐनवेळी स्पर्धेतून माघार घेता येणार नाही. तशी अधिकृत स्वरुपात आगाऊ कल्पना न देता ऐनवेळी माघार घेतल्यास संबंधित स्पर्धकाला पुढील वर्षीच्या स्पर्धेसाठी बाद ठरविण्यात येईल.

२०.वरील नियमाबद्दल कोणतीही शंका निर्माण झाल्यास कला अकादमीच्या अध्यक्षांच्या त्यासंबंधीचा निर्णय अंतिम व सर्वाना बंधनकारक राहील.

२१.वरील नियमात आवश्यक वाटल्यास कोणत्याही क्षणी व स्पर्धेच्या कोणत्याही टप्पावर फेरफार करण्याचा संपूर्ण अधिकार कला अकादमीने राखून ठेवला आहे. असा फेरफार केल्यास तो स्पर्धेत सहभागी होणा-या सर्व स्पर्धकांवर बंधनकारक राहील.

*****

कला अकादमी गोवा

## बाल- युवा कीर्तन स्पर्धा

विहित नमुन्यातील अर्ज

बाल गट-वय ७ ते १४( ) युवा गट-वय १५ ते २१( )

१. स्पर्धकाचे नाव : ------------------------------------------------

२.Name of the participant as per Bank Account (in English:)

------------------------------------------------------------

३. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :------------------------------------------------------------------------------------------------------------------

दूरध्वनी क्र.----------------- भ्रमणध्वनी क्र. :----------------------

४. गायकाची स्वरपट्टी (काळी पाच, पांढरी दोन इ.) खाली नमूद करणे.

---------------------------------------------------

मठ कुमार/कुमारी.-----------------------------------------------

स्पर्धेचे सर्व नियम व अटी अवगत करुन घेतले असून त्याचे पालन करण्यास मी बंधनकारक आहे. तसेच अकादमीने नियुक्त केलेल्या परीक्षक मंडळाचा निर्णय मला मान्य असेल व या स्पर्धेसंबंधातील कुठल्याही बाबीसंदर्भात कला अकादमीच्या निर्णयास मी बांधील असेन.


--------------------

स्पर्धकाचे नाव व सही

नाव :-----------------------------------

दिनांक :--------------

स्थळ : ---------------




Produce by: Kala Academy Goa, Panaji - Goa - 403 001 (INDIA)
Ph.: (0832) 2420451 / 52 / 53 / 54 Fax: 0832 - 2420457
Email: kalaacademygoa@yahoo.co.in Website: kalaacademygoa.co.in